MHBI120003352018

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६७/२०१८ मधील निशाणी क्रमांक ३४ वर आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज गोरख नामदेव मात्रे यांनी वादी क्र. १ लिंबाजी रायभान रोटे यांचे कायदेशीर वारस प्रस्तुत दाव्यात वादी सदरात समाविष्ठ करण्यास झालेला उशीर माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. उपरोक्त अर्जदार यांनी असे नमुद केले आहे की, वादी क्र. १ लिंबाजी रायभान रोटे हे दिनांक ०४.०६.२०१९ रोजी मयत झाले आहेत. तसेच वादी क्र. १ यांनी दिनांक २१.०८.२०१८ रोजी वादमिळकतीतील त्यांचा हिस्सा अर्जदार यांना विक्री केला आहे. त्यानंतर अर्जदार हे वादमिळकतीचे मालक झाले असून ताबेकब्ज्यात आहेत. वादी क्र. १ यांच्या मृत्यूनंतर अर्जदार यांना वादमिळकतीबाबत प्रतिवादीविरूध्द दाद मागण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. अर्जदार यांनी वादी क्र.१ यांच्या हिस्स्याची वादमिळकत खरेदी केली असल्याने वादी क्र. १ यांचे वादमिळकतीबाबत अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत. वादी क्र. १ यांच्या मृत्युनंतर अर्जदार यांना दाव्यात सामाविष्ठ करणेस विलंब झाला आहे. प्रस्तुत प्रकरणाबाबत अर्जदारा यांना दिनांक ०१.१२.२०२१ पर्यंत माहिती नसल्याने सदरचा अर्ज मुदतीत दाखल करू शकले नाहीत. सदरचा अर्ज मंजूर न झाल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल ते कशानेही भरून निघणार नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर कण्यात यावा.

३. अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदार यांनी उशीर झाले बाबत संयुक्तीक कारण दिलेले नाही. तसेच कोणतेही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. वादमिळकत अर्जदार यांनी

खरेदी केल्याची बाब वादी क्र. १ याने त्याच्या हयातीत न्यायालयासमोर आणलेली नाही. सबब सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील प्रतिवादींच्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

५. अर्ज, अर्जासोबत दाखल केलेले खरेदीखत व म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र. १ यांनी दिनांक २१.०८.२०१८ रोजी वादमिळकतीतील त्यांचा हिस्सा अर्जदार यांना विक्री केला आहे. त्यानंतर अर्जदार हे वादमिळकतीचे मालक झाले आहेत असे वादी यांचे म्हणणे आहे. अर्जदार यांनी वादी क्र.१ यांच्या हिस्स्याची वादमिळकत खरेदी केली असल्याने वादी क्र. १ यांचे मृत्यूनंतर वादमिळकतीमधील वादी क्र.१ यांच्या हिस्स्याच्या मिळकती बाबत अर्जदार हे कायदेशीर वारस झाले आहेत. वादी क्र. १ यांच्या मृत्यूनंतर अर्जदार यांना वादमिळकतीबाबत प्रतिवादीविरूध्द दाद मागण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की उपरोक्त अर्जदार यांनी झालेल्या विलंबाबत संयुक्तिक कारण दर्शविले आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वाच्या दृष्टीने वादीस त्याचे वारस अभिलेखावर आणण्याची संधी देणे गरजेचे आहे. तशी संधी न दिल्यास त्यांचे अपरीमीत नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रस्तुत प्रकरणातील वाद विषय व झालेला विलंब लक्षात घेता प्रतिवादी क्र. १ व २ यांना खर्चाची रक्कम रू. २००/— देणे न्यायोचित आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| **१.** | सदरचा अर्ज (**निशाणी क्र. ३४**) अर्जदार यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना एकत्रित खर्चाची रक्कम रू. २००/— देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २. | वादी क्र. १ लिंबाजी रायभान रोटे यांचे वारस म्हणून अर्जदार गोरख नामदेव मात्रे यांना प्रस्तुत दाव्यात वादी सदरात समाविष्ठ करण्यास झालेला उशीर माफ करण्यात येत आहे. |

दि. ०९.१२.२०२१
स्थळ: धारूर

(रा.व.कदम)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
धारूर

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरून अपलोड केलेल्या आदेश/न्यायनिर्णयातील शब्द–नि–शब्द हे मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखक ग्रेड.३** | : | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीख | : | ०९.१२.२०२१ |
| न्यायनिर्णय/आदेशावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०९.१२.२०२१ |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची तारीख | : | १०.१२.२०२१ |

**सही/–**
(ए.एस.गंगणे)
(लघुलेखक ग्रेड–३)
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर